# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## निवडणूक विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५


जावक क्रमांक/गो.वि./ निवि/२५७/२०२२ दिनांक ०२/०९/२०२२

## अधिसभा विद्या परिषद आणि अभ्यास मंडळ निवडणूक २०२२
## मतदारांना महत्वाच्या सुचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम2016 च्या कलम 28 नुसार अधिसभा, कलम 32 नुसार विद्या परिषद व कलम 40 नुसार अभ्यास मंडळ या प्राधिकरणांवर सदस्य म्हणून निवडूण येण्यासाठी विद्यापीठाच्या व्दारे निर्गमित करण्यात आलेल्या सुचना/अधिसूचना नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 कलम 28 (2)(ण), 28 (2)(त), 28 (2)(द), 28 (2)(ध), 28 (2)(न) नुसार अनुक्रमे प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, महाविद्यालयीन अध्यापक , विद्यापीठ अध्यापक आणि नोंदणीकृत पदवीधर गटातून त्याचप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – 2016 चे कलम 32(2)(छ) नुसार विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे 2 याप्रमाणे अध्यापक आणि कलम 40 (2)(ग) नुसार अभ्यास मंडळावर संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील विभाग प्रमुख (अभ्यास मंडळातील प्रत्येक विषयावर 3 याप्रमाणे) निवडूण द्यावयाचे आहे. याकरीता दिनांक 22-07-2022 नुसार संबधीत निर्वाचण गणाकरीता सदस्य निवडणूकीव्दारे निवडून देण्यासाठी अधिसूचना निर्गमीत करण्यात आली होती.

सबब या अधिसूचनेव्दारे वर नमूद सर्व निर्वाचण गणाच्या मतदारांना मतदान करतांना सोयीचे व सुलभ व्हावे या दृष्टीकोनातून खालील सुचना देण्यात येत आहे. कृपया मतदानापूर्वी अवश्य अवलोकन करुन कार्यवाही घ्यावी.

१. उपरोक्त निवडणूक प्रक्रीया ही अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत पार पाडावी.
२. उपरोक्त प्रक्रीया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाला सर्वतोपरी सहाय्य करावे.
३. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र परिसरात तसेच मत मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी केंद्र परिसरात संपूर्ण शांतता राखावी व नियमांचे पालन करावे.
४. मतदान केंद्राच्या १०० मिटर परिसरात कोणत्याही प्रकारचा उमेदवाराचा प्रचार करता येणार नाही.
५. मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविण्यास्तव खाली नमूद प्रकारचे कोणतेही ओळखपत्र दाखविल्यावरच व त्यानुसार संबंधिताची ओळख पटल्यावरच त्यास मतदान करता येईल.

अ) आधारकार्ड
ब) भारत सरकार निवडणूक आयोगाचे ओळखपत्र
क) पारपत्र (पासपोर्ट)
ड) वाहन परवाना (ड्रायव्हींग लायसन)
इ) संबधीत महाविद्यालय/विद्यापीठ/शासकीय कार्यालय यांचेव्दारा निर्गमीत करण्यात आलेले ओळखपत्र
ई) पॅनकार्ड
फ) छायाचित्र असलेले बँकेचे पासबुक

६. ओळखपत्र व त्याच्या पडताळणी शिवाय मतदान करता येणार नाही.
७. मतदाराने त्याच्या डाव्या लगतच्या बोटावरील नखाच्या मुळापासून न पुसल्या जाणा-या शाईने खुण करण्यास्तव मतदान अधिकाऱ्यास सहकार्य करावे. तसे करु न दिल्यास मतदान करु दिल्या जाणार नाही.
८. मतदाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठया लगतच्या बोटावर अंकीत खुण मतदान अधिकारी यांना दाखविल्यानंतर त्यास मतपत्रिका घेण्यापूर्वी मार्क मतदार स्वाक्षरी करणे अनिवार्य राहील. तसे न केल्यास त्यास मतपत्रिका दिल्या जाणार नाही.
९. मतदाराने त्याचे नाव असलेल्या सर्व निर्वाचण गणाच्या प्राप्त मतपत्रिकेचे पूर्ण संच प्राप्त झाले अथवा नाही याबाबत प्रथम खात्री करावी.
१०. मतदान करतांना प्राप्त सर्व मतपत्रिकेच्या संचातील सर्व मतपत्रिकांवर पसंतीक्रम नोंदविणे आवश्यक आहे. पसंतीक्रम नोंदविला नसल्यास उपरोक्त मतपत्रिका बाद ठरविण्यात येईल.

११. मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविणे म्हणजे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोरील निर्देशित जागेवरील केवळ १ नमुद करणे असा आहे. दुसरा पसंतीक्रम याचा अर्थ उमेदवाराच्या नावासमोरील निर्देशित जागेवरील २ नमुद करणे असा आहे. तिसरा पसंतीक्रम याचा अर्थ मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोरील निर्देशित जागेवर १, २ च्या नंतर ३ नमुद करणे असा आहे. याप्रमाणे पुढील पसंतीक्रम नमुद करावे.

१२. मतपत्रिकेत नमूद असलेल्या सर्व नावासमोर मतदार पसंतीक्रम देवू शकतो.

१३. मतपत्रिकेवर पसंतीक्रम हा निळया शाईखेरीज इतर कोणत्याही रंगाच्या बॉलपेनने अंकीत करता येणार नाही.

१४. मतदान करण्यापूर्वी मतपत्रिकेचे संपूर्ण निरिक्षण करावे व त्यावर दिलेल्या सूचना अवश्य वाचाव्या.

१५. कोणत्याही मतदाराने मतपत्रिका सोबत घेवून जाऊ नये.

१६. मतदान झाल्यानंतर मतपत्रिका या मतपेटीतच टाकाव्यात.

१७. मतपत्रिकेवर ओळख पटेल अशी कोणतीही खुण, चिन्ह, स्वाक्षरी करु नये. तसे आढळल्यास उपरोक्त मतपत्रिका बाद करण्यात येईल.

१८. पसंतीक्रमाचे अंक हे फक्त इंग्रजी/ मराठी यापैकी कोणत्याही एका भाषेतील असावे.

१९. भाषेची सरमिसळ करुन अंक नमुद केले असल्यास उपरोक्त मतपत्रिका बाद करण्यात येईल.

२०. मतपत्रिकेतील पसंतीक्रमांच्या अंकासमोर ०१, ०२, ०३ अशाप्रकारे ० सुरुवात करुन पंसतीक्रम अंकीत करु नये. अशा पध्दतीची मतपत्रिका आढळल्यास ती बाद करण्यात येईल.

२१. मतपेटीमध्ये मतपत्रिका टाकल्यानंतर निर्धारित मार्गानेच बाहेर जावे, जेणेकरुन मतदान कक्षात गर्दी होणार नाही.

२२. अत्यंत महत्वाचे

अ) अतीसंवेदनशील मतदान केंद्रांची नावे.

१. एस. बी. कला वाणिज्य महाविद्यालय, अहेरी, जि. गडचिरोली

२. भगवंतराव कला वाणिज्य महाविद्यालय, एटापल्ली, जि. गडचिरोली

३. राजे विश्वेश्वेरराव कला वाणिज्य महाविद्यालय, भामरागड, जि. गडचिरोली

४. भगवंतराव कला महाविद्यालय, सिरोंचा, जि. गडचिरोली

वर नमुद एकूण ०४ मतदान केंद्रे अतिसंवेदनशिल असून मतदानाची वेळ सकाळी ७:०० ते दुपारी ०३:०० वाजेपर्यत राहील. तसेच उर्वरित ५० मतदान केंद्राची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

स्थळ :- गडचिरोली
दिनाक ०२-०९-२०२२

कुलसचिव
निवडणूक अधिकारी तथा कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सादर

१) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हा
४) सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांचे अध्यापक , पदव्युत्तर अध्यापक , मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक आणि अध्यापक
५) सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे व्यवस्थापन प्रतिनिधी.
६) विद्यापीठाचे सर्व अध्यापक
७) विद्यापीठाचे सर्व नोदंणीकृत पदवीधर.
८) विद्यापीठातील सर्व अधिकारी
९) मा. जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हा
१०) गडचिरोली, चंद्रपूर जिल्हयातुन प्रसिध्द होणाऱ्या दैनिक वर्तमान पत्रांचे सर्व मा. संपादक विनंती आहे की, उपरोक्त अधिसुचना आपल्या वर्तमान पत्रात बातमी म्हणून प्रसिध्द करण्यास्तव.
११) www.unigug.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव.